# लेखापरीक्षणाचे नवीन निकष व गुण तक्ता बाबत टिपणी

**- तान्हाजी नथु कवडे, सहनिबंधक लेखापरीक्षण महाराष्ट्र राज्य पुणे (सेवानिवृत्त)**

माननीय सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी महाराष्ट्र राज्यातील नागरी व ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था तसेच सेवक सहकारी पतसंस्था यांना प्रथमत दिनांक 29/4/ 2010 अन्वये लेखापरीक्षण वर्गवारीचे गुणनिकष परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्यात आलेले होते.

त्यामध्ये 28/ 12/2011 व 30 /4/2011 असे वेळोवेळी बदल करण्यात आलेले होते. तदनंतर सहकार कायद्यातील काही बदल तसेच सहकार कायद्यात सन 2017च्या सुधारणेने सहकारी पतसंस्थांना कलम 144 नव्याने लागू करणेत आलेले असून त्यातील तरतुदीनुसार सहकारी पतसंस्थांसाठी नियामक मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे .

या नियामक मंडळाच्या सभांमध्ये वेळोवेळी जे जे निर्णय घेतले जातात असे निर्णय परिपत्रकाद्वारे नागरी पतसंस्थांना कळविले जातात . असे काही निकष व निर्णय 2019 पासून पतसंस्थांना लागू करण्यात आलेले आहेत. अशा निकषांचा समावेश पतसंस्थांना देण्यात येणाऱ्या गुण तक्त्यामध्ये समावेश करणे आवश्यक होते. तसेच एनपीएमध्ये काही बदल करण्यात आलेले होते, तेही पतसंस्थांना लागू होणे आवश्यक होते व त्याचा समावेश गुण तक्त्यात होणे आवश्यक होते, त्यामुळे माननीय सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयाने नागरी/ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांना दिनांक 27/3/ 2024 चे परिपत्रकां अन्वये सुधारीत निकष लागू केलेले आहेत. असे हे वर्गवारी देण्याबाबतचे सुधारीत गुणनिकष आर्थिक वर्ष सन 2024-25 व त्यापुढील आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षणाकरता लागू करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चे नियम 69 मध्ये असे नमूद आहे की वैधानिक लेखा परीक्षकांनी लेखापरीक्षण पूर्ण केल्यानंतर संस्थेस लेखापरीक्षण वर्गवारी प्रदान करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण वर्गवारी मुळे संस्थेची आर्थिक व संपत्ती स्थिती सुयोग्य असल्याचे निदर्शनास येण्यास मदत होते. सदरहू वर्गवारी अ ब क व ड या वर्णाक्षराने निश्चित केल्याने अनुक्रमे उत्कृष्ट, निश्चित चांगला ,चांगला, वाईट अशी संस्थेची आर्थिक पत व विश्वासार्हता निश्चित करण्यासाठी सुलभता प्राप्त होते. लेखापरीक्षा वर्गवारी गुणतक्ता निकषामुळे राज्यभरातील कोणत्याही प्रकारातील लेखा परीक्षकाने या संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले तरी लेखापरीक्षा वर्गवारी प्रधानामध्ये एक समानता व एकसूत्रता राखली जाते.

नागरी सहकारी पतसंस्थांना लेखापरीक्षणाची वर्गवारी गुण तक्ता हा रिझर्व बँकेने सर्व बँकांना ज्याप्रमाणे कॅमल्स रेटिंग वर आधारित गुण दिले जातात त्याच धर्तीवर पतसंस्थांना त्यामध्ये काही बदल सुचवून लेखापरीक्षण वर्गवारी गुण तक्ता तयार करण्यात आलेला आहे .त्यामध्ये सहा घटक निश्चित करण्यात आलेले आहेत. अशा सहा घटकांसाठी प्रत्येकी 100 गुण निश्चित करण्यात आलेले आहेत. असे एकूण 600 गुणांचा वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी गुण तक्ता तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये सहा बाबीवर खालील प्रमाणे घटक निश्चित केलेले आहेत.

### 1) भांडवलपर्याप्तता (Capital Adequacy) यामध्ये -

1) भांडवल निधीचे जोखीम भारीत जिंदगीशी प्रमाण.
2) भांडवल निधी वाढविण्याची क्षमता.
3) वसूल भाग भांडवलात झालेली वाढ.
4) स्वनिधीतील वाढ.

### 2) जिंदगीची गुणवत्ता (Asset Classification) यामध्ये -

1) निव्वळ अनुत्पादक जिंदगी (नेट एनपीए प्रमाण )

2) ढोबळ अनुत्पादक जिंदगी (ग्रॉस एनपीए प्रमाण )
3) गत्तवर्ष अखेर असणाऱ्या अन उत्पादक कर्जापैकी चालू आर्थिक वर्षात झालेल्या वसुलीचे प्रमाण.
4) कर्ज व्यवहार

**3) व्यवस्थापन मॅनेजमेंट यामध्ये -**

1) सभा कामकाज
2) सहकार तज्ञ संचालक
3) सहकार शिक्षण व प्रशिक्षण
4) अनुत्पादक जिंदगी मधील संशयित वर्गवारीतील. कर्जदारांवर कायदेशीर कारवाई
5) कलम 101 खालील वसुली दाखले/ कलम 91 खालील निवाडे अंमलबजावणी
6) सभासदत्व
7) संचालक मंडळ निवडणूक

**4) उत्पन्न (Earnings) यामध्ये -**

1) निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाची प्रमाण
2) निव्वळ नफ्याचे सरासरी कर्ज अधिक गुंतवणुकीशी प्रमाण
3) निव्वळ नफ्याचे स्वनिधीशी प्रमाण
4) व्याजातील सरासरी दुरावा
5) शिल्लक नफा व सर्व निधीस वर्ग केलेल्या नफ्याचे निव्वळ नफ्याशी प्रमाण
6) व्यवसायातील नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण
7) व्यवस्थापन खर्चाचे सरासरी खेळत्या भांडवलाची प्रमाण
8) तरतुदी

**5) तरलता (Liquidity) यामध्ये -**

1) सरासरी कर्ज व ठेवी प्रमाण (CD Ratio)
2) वैधानिक तरलता निधी प्रमाण (SLR)
3) रोख राखीव निधी प्रमाण (CRR)
4) मुदत ठेवींचे एकूण ठेवींशी सरासरी प्रमाण
5) एकूण गुंतवणुकीत अनुत्पादक गुंतवणुकीचे प्रमाण
6) गतसालच्या तुलनेत ठेवीमधील सरासरी वाढ.

**6) कार्यपद्धती व नियंत्रण (System & Control)**

यामध्ये नियामक मंडळांनी ठरवलेले काही निकष तसेच सहकार कायद्यातील काही तरतुदीचे पालन, दोष दुरुस्ती अहवाल, संगणकीकरण, तसेच इतर बाबी अशा 22 बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे सहा बाबींना संस्थेला प्रत्येकी 100 गुणांपैकी जे गुण लेखापरीक्षकानी दिली जातील अशा मिळालेल्या गुणांचे सरासरी भारांकन निश्चित केलेले आहे.ते खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1) | भांडवलपर्यक्तता (Capital Aequacy) | 15% |
| 2) | जिंदगीची गुणवत्ता (Asset Quality) | 25% |
| 3) | व्यवस्थापन | 15 % |
| 4) | उत्पन्न (Earnings) | 20% |
| 5) | तरलता (Liqidity) | 15% |
| 6) | कार्यपद्धती व नियंत्रण (System & Controls) | 10% |

असे एकूण सरासरी भारांकन आहे. सरासरी भारांकना नुसार येणाऱ्या एकूण गुणातून खालील काही बाबतीत गुण वजा करावयाचे आहे.

जसे की संस्थेत गैरव्यवहार/अफरातफर असल्यास, नियम 35 प्रमाणे कर्ज उभारणीचे मर्यादेचे उल्लंघन केले असल्यास, पाच टक्केचे वर थकबाकी असल्यास, बँक खात्याची मेळ पत्रके तयार केली असल्यास व त्यात फरक असल्यास, मुख्यालय व शाखांचे मेळपत्रके तयार केली असूनही तीन महिन्याच्या वरील नोंदी प्रलंबित असल्यास, भागभांडवल, सर्व प्रकारची कर्जे,ठेवी, व्याज येणे देणे, इतर येणे देणे,थकव्याज तरतूद इत्यादी याद्या ताळेबंदाशी जुळत नसल्यास,वैयक्तिक व समूह कमाल कर्ज मर्यादेचे उल्लंघन झाले असल्यास, थकीत कर्ज वसुली वेळी सामोपचार योजना राबवताना शासन निर्देशाचे उल्लंघन झाले असल्यास, कलम 70, 144- 10, उपविधी मधील तरतूद व नियमक मंडळाचे निर्देशाचे उल्लंघन झाले असल्यास ,कलम 144- 7 अनुसार संस्थेस आवश्यक नसेल अशा मालमत्तेची विल्हेवाट मुदतीत लावली नसल्यास, कलम 65 नियम 49 अ मधील तरतुदी व नियामक मंडळाकडून परिपत्रकीय सूचनानुसार उत्पादक व अनुत्पादक कर्ज ,गुंतवणूक इतर जिंदगी इत्यादी बाबत आवश्यक त्या सर्व तरतुदी न करता निव्वळ नफा किंवा तोटा निश्चित केल्यास, संचालक मंडळ व संचालकांचे नातेवाईकांची कर्ज व इतर येणे रकमा थकीत असल्यास व कायदेशीर कारवाई केली नसल्यास, कलम 144 मध्ये नमूद व्यतिरिक्त इतर कामकाज व कलम 144- 6अ मध्ये नमूद व्यतिरिक्त संस्था व्यापार करीत असल्यास, अशा काही बाबींचे उल्लंघन केले असल्यास 25 गुण भारांकनानुसार मिळालेल्या गुणातून वजा करावयाचे आहेत.तसेच जर एखाद्या संस्थेने दुसरी एखादी संस्था विलीनीकरण करून घेतली असल्यास अशा संस्थेत मिळालेल्या वर्गवारीचे सरासरी भरांकण गुणांमध्ये खालील प्रमाणे प्रतिवर्षी जादा गुण देण्यात यावेत असे नमूद आहे

**प्रथम वर्ष पाच गुण, द्वितीय वर्ष चार गुण ,तृतीय वर्ष तीन गुण ,चौथे वर्ष दोन गुण, पाचवे वर्ष एक गुण.**

**संस्थेस लेखापरीक्षण वर्ग खालील प्रकारे गुण प्राप्त झाल्यावर प्रदान केला जातो.**

| | | | |
|---|---|---|---|
| **1)** | **75 व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यास** | **-** | **अ वर्ग** |
| **2)** | **61 ते 74 पर्यंत गुण प्राप्त झाले असल्यास** | **-** | **ब वर्ग** |
| **3)** | **51 ते 60 पर्यंत गुण प्राप्त झाले असल्यास** | **-** | **क वर्ग** |
| **4)** | **50 पर्यंत गुण प्राप्त झाले असल्यास** | **-** | **ड वर्ग .** |

प्रत्येक सहकारी संस्थेने आपल्या संस्थेची प्रगती वाढवण्यासाठी वर्षाच्या सुरुवातीस माननीय सहकार आयुक्त यांच्या सुधारित गुणनिकषाचा सखोल अभ्यास करून त्याप्रमाणे वर्षभरात आपल्या संस्थेचे व्यवहार व्यवस्थित रित्या केल्यास तसेच गुण तक्त्यात नमूद सर्व रेशो व पॅरामीटर्स याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन त्या पद्धतीने दर सहामाही पद्धतीने आपल्या संस्थेचे मार्कशीट स्वतः तयार केल्यास वर्षाखेरीला वरचा वर्ग प्राप्त होण्यासाठी याचा निश्चितच उपयोग होउ शकेल.

सदर लेखापरीक्षण वर्गवारी गुण निकष परिपत्रकात गुण तक्ता भरण्यासाठी ज्या मार्गदर्शक सूचना नमूद केलेल्या आहेत त्याचाही सखोल अभ्यास प्रत्येक संस्थेने करणे आवश्यक आहे.

**- तान्हाजी नथु कवडे**
**सहनिबंधक लेखापरीक्षण**
**महाराष्ट्र राज्य पुणे (सेवानिवृत्त)**

# राज्यातील नागरी व ग्रामीण बिगर कृषी पतसंस्थांना मान्य उत्पन्न संकल्पना, जिंदगीचे वर्गीकरण व (एनपीए) तरतुदी.

**- तान्हाजी नथु कवडे, सहनिबंधक लेखापरीक्षण महाराष्ट्र राज्य पुणे (सेवानिवृत्त)**

सहकार चळवळीमध्ये महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर राज्य असून नागरी सहकारी बँकांप्रमाणेच राज्यातील मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या नागरिक सहकारी पतसंस्था व बिगर शेती सहकारी पतसंस्था या आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हाव्यात व संस्थांमधील ठेवीदारांचे हित जोपासण्यासाठी नागरी सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बॅंका, खाजगी बँकांमध्ये अस्तित्वात असलेली लेखापद्धती व विवेकी : मापदंड (प्रुडेन्शियल नॉम्स) राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था व बिगर शेती सहकारी पतसंस्था यांना 2005-06 पासून लागू करण्यात आलेले होते. त्यामध्ये काही बदल करून महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ तथा सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयाने दिनांक 5 फेब्रुवारी 2024 रोजी एनपीएच्या बाबत नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदरचे एनपीएचे नवीन निकष हे आर्थिक वर्ष 2024-2025 या वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत.

### एनपीए या संकल्पनेचे मुख्य तत्त्व:

संस्थांचा ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक संबंधित संस्थांची योग्य व रास्त आर्थिक स्थिती दर्शविण्यासाठी सहकारी पतसंस्थांनी उत्पन्न क्षमता नसलेल्या (\PA) जिंदगी / मालमत्ता अथवा कर्ज खात्यावर आकारण्यात आलेले कोणतेही व्याज अथवा इतर उत्पन्न है प्रत्यक्ष वसूल झाल्याखेरीज नफा तोटा खाती उत्पन्न्.महणून घेऊ नये.

### विविध व्याख्या-

- **अनुत्पादक जिंदगी म्हणजे काय**

नागरी सहकारी पतसंस्थांचे ताळेबंद व हिशेब पत्र योग्य आर्थिक स्थिती दर्शवणारे असावेत. उत्पन्न क्षमता नसलेल्या कर्ज खात्यावर आकारलेले व्याज प्रत्यक्ष वसूल झाल्याखेरीज व्याज उत्पन्नात धरू नये, है यामध्ये मुख्य तत्त्व आहे आणि म्हणूनच ज्या कर्ज खात्यातून अथवा इतर मालमत्तेपासून उत्पन्न मिळत नाही असे कर्ज खाते अथवा मालमत्ता उत्पन्न क्षमता नसलेली एनपीए समजावे. म्हणजे एखादे कर्ज उत्पन्न निर्मिती करण्यास असमर्थ ठरते अथवा उत्पन्न निर्मिती करत नाही तेव्हा ते कर्ज /मालमत्ता एनपीए समजावे. एनपीए म्हणजे एखाद्या कर्ज खात्यावरील व्याज कर्जाचा हप्ता हा ठरवून दिलेल्या कालावधीनंतरही वसूल न झाल्यास असे खाते एनपीए होय.

- **थकबाकी आणि एनपीए**

जेव्हा ठरलेल्या कर्जाचा हप्ता व्याज भरले जात नाही तेव्हा ते खाते रककम थकबाकी मानली जाते. थकबाकी भरणा करण्याच्या नियत तारखेशी संबंधित असते. एनपीए खात्याचा ठराविक मुदतीशी संबंधित असतो. उदाहरणार्थ; 180 दिवस कर्जाचा हप्ता व्याज न आल्यास खाते एनपीए होते म्हणजेच विनिर्दिष्ट कालावधीत कर्जाचा हप्ता व्याज न आल्यास खाते अनुत्पादक (एनपीए)समजल्ने जाते.

- **खेळते भांडवलासाठी केश क्रेडिट किवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर दिनांक)**

मुदत कर्जाव्यतिरिकत पतसंस्था खेळते भांडवलासाठी कॅश क्रेडिट किंवा ओलव्हरडॅफ्ट सारंखी कर्ज देतात. या कर्जात जास्तीत जास्त बारा महिने मुदतीसाठी विशिष्ट कर्ज मर्यादा मंजूर केली जाते व या मर्यादेचे अधीन राहून या खात्यावर उलाढाल जमा नावे व्यवहार करण्याची उभा दिली 'जाते.. या कर्ज प्रकारात मुदत कर्जासारखी नियत दिनांक मुद्दल अथवा व्याज परतफेड अपेक्षित 'नसल्याने अशी कर्ज खाती काही कारणाने

अनियमित होऊ शकतात.त्यामध्ये अधिक कालावंधीची व्याज थकीत असल्यास किंवा मुदत संपलेल्या दिनांकापासून कर्ज नूतनीकरण न केल्यास किंवा कर्जाची तारण उचल पात्र मर्यादा किंवा मंजूर मर्यादिपैकी किमान रकमेच्या तुलनेत खात्यावरील व्याज व खर्चासह येणे बाकी सातत्याने अधिक असेल तर किंवा एका आर्थिक वर्षात संदर कर्ज खात्यामध्ये 'मंजूर मर्यादेच्या किमान चारपट व्यावसायिक उलाढाल दुबेरजी नोंदी सोडून न झाल्यास.

- **मुदत कर्जासाठी अनुत्पादक जिंदगी (एनपीए) दिनांक**

एखाद्या जिंदगी मालमत्तेवरील उत्पन्न अथवा मुदत कर्ज खात्यावरील थकीत व्याज अथवा मुद्दल परतफेड हप्ता किंवा दोन्हीही. यापैकी कोणतीही थकबाकी निर्धारित रक्कम केलेल्या मुदतीनंतर देखील वसूल होत नाही, अशावेळी एनपीए गणना करण्याच्या दिवशी त्या त्या आर्थिक वर्ष किंवा कालावधीसाठी उत्पादक जिंदगी निश्चितीसाठी जो निर्धारित कालावधी दिला आहे, तो कालावधी ज्या दिवशी संपेल तो अनुत्पादक जिंदगी (एनपीए) दिनांक होईल. एनपीए निश्चितीसाठी 180 दिवस एवढा कालावधी राहील. अनुत्पादक जिंदगी मालमत्ता अथवा कर्ज खात्यावर वसूल न होणारे व्याज कर्ज करारानुसार स्वतंत्रपणे बाजूला काढून ठेवावयाचे असून विमा खर्च, वसुली खर्च, टपाल खर्च इत्यादी खर्च रकमा संस्थांनी स्वतःचे नफा तोटा खाते नावे टाकून जमा खर्च करावयाचा आहे. सदरच्या स्वतंत्र दुबेरजी नोंदी करून प्रत्यक्ष वसुलीच्या वेळी ही रककम वसूल करावी. नागरी/ ग्रामीण सहकारी पतसंस्थांनी एनपीए खात्यात कर्जाचा हप्ता व्याज प्रत्यक्षात वसूल झाले नसल्यास अनुत्पादक जिंदगी मालमत्तेचे एनपीए वर्गीकरण खाली नमूद कालावधीनुसार करावे.

**अ) उत्तम जिंदगी (स्टँडड असेट)**

थकबाकी किंवा खेळते आंडवल बाबतीत निर्धारित कालावधी 180 दिवस किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचा असल्यास सदर खाते उत्तम जिंदगी समजण्यात येईल. यावर किमान 0.25 टक्के तरतूद करण्यात यावी. सदर तरतूद ही निव्वळ नफा काढण्यापूर्वी वेळप्रसंगी तोटा सहन करून करावी. वरील तरतूद रककम नियम 35 नुसार स्वनिधी निर्धारित करताना विचारात घेता येणार नाही. तथापि अन्य उद्देशासाठी असलेल्या बाबीत समाविष्ट करता येईल.

**ब) अनुत्पादक जिंदगी मालमत्ता (सब स्टँडर्ड अंसेट)**

जे कर्ज खाते अनुत्पादित दिनांकापासून सतत बारा महिने अनुत्पादित असल्यास किंवा थकीत/अनियमित ऑर्डर दिनांक पासून 18 महिने थकीत किंवा अनियमित असल्यास अशा खात्यास दुय्यम खाते (सब स्टँड आँसेट) खाते समजावे. अशा रकमेवर किमान 5% इतकी तरतूद करण्यात यावी.

**क) संशयित कर्ज खाते (डाऊटफुल असेट)**

**1) संशयित कर्ज खाते 1 (डाऊटफुल अँसेट 1)**

जे कर्ज खाते अनुत्पादित दिनांक पासून बारा महिन्यापेक्षा जास्त परंतु 36 महिन्यापेक्षा कमी कालावधी करता अन उत्पादित असल्यास किंवा थकीत अथवा अंनियमित दिनांक पासून 18 महिने पेक्षा जास्त परंतु 42 महिन्यापर्यंत थकीत अथवा अनियमित असल्यास अशा खात्यास संशयित कर्ज खाते एक असे समजावे. अशा खात्यावर तारणी 15% विनातारणी 60% तरतूद करण्यात यावी.

**2) संशयित कर्ज खाते 2 (डाऊटफुल असेट 2)**

जे कर्ज खाते अनुत्पादित दिनांक पासून सतत 36 महिन्यापेक्षा जास्त परंतु 48 महिन्यापेक्षा कमी कालावधी करता अनुत्पादित असल्यास किंवा थकीत अथवा अनियमित दिनांक पासून 42 महिने पेक्षा जास्त परंतु 54 महिन्यापर्यंतच्या काळापर्यंत थकीत अथवा अनियमित असल्यास अशा खात्यास संशयित कर्ज खाते 2 समजावे. अशा कर्ज खात्यावर तारणी 20% विनातारणी 70 टक्के तरतूद करावी.

**3) संशयित कर्ज खाते 3 (डाऊटफुल अँसेट 3)**

जे कर्ज खातें अनुत्पादित दिनांक पासून फक्त 48 महिन्यापेक्षा जादा कालावधी करिता एनपीए असल्यास किंवा थकीत अथवा अनुत्पादीत दिनांकापासून 54 महिने पेक्षा जास्त काळापर्यंत थकीत अथवा अनियमित असल्यास अशा खात्यास संशयित कर्ज खाते3 समजावे. अशा रकमेवर तारणी 25% विनाकारणी 80% तरतूद करण्यात यावी.

**4) बुडीत कर्ज खाते**

जे कर्ज खाते वसूल होणे होणे अशक्य असून कर्जासाठी दिलेल्या तारणाचे मूल्य वसुलीक्षम नाही. तसेच वैधानिक लेखापरीक्षक किंवा संस्थेने स्वतःहून कोणतेही थकीत अथवा अनियमित्त कालावधी विचारात न घेता ज्या खात्याचे वर्गीकरण बुडीत कर्ज खाते म्हणून केले असेल असे कज किंवा जिंदगी /मालमत्ता यावर किमान 100 टक्के तरतूद करावी.बुडीत कर्ज खात्यात पुढील कर्ज खात्यांचा समावेश केला जातो

1) वसुली करिता लवाद दावा निवाडा मिळवण्याची किंवा त्याची अंमलबजावणीची मुदत संपली असल्यास कर्जाची कागदपत्रे नष्ट झाली असल्यास.

2) कर्जदार व जामीनदाराने आपली नादारी जाहीर केल्यास कर्ज वसुलीसाठी कर्जदाराकडे संपत्ती शून्य असल्यास.

3) कर्ज घेणारी व्यकती संस्था अस्तित्वात नसल्यास किंवा दीवाळखोर निघाल्यास.

4) कर्जदारांचे नावे कोणतीही संपत्ती नसल्यास किंवा त्याचे कार्यक्षेत्र सोडून गेल्यास अनेक वर्षापासून बेपत्ता असल्यास त्याचे विरुद्ध कारवाई करण्यास अडचण येत असल्यास.

- **एनपीए बाबत काही महत्वाच्या सूचना**

1) प्रत्येक संस्थेने संचालक मंडळ सभेमध्ये गुंतवणूक कर्ज वितरण वसुली अथवा एनपीए व्यवस्थापनाबाबत सर्वसमावेशक धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

2) अनुत्पादक जिंदगी (एनपीए) ही संकल्पना केवळ कर्ज या: मालमत्तेपुरती मर्यादित नसून गुंतवणुकीसह संस्थेच्या सर्वच जिंदगी व मालमत्तेसाठी 'लागू आहे.

3) उपविधी किंवा नियामक मंडळाचे मान्यतेनुसार, पतसंस्थांना खेळते भांडवलासाठी केवळ कॅश क्रेडिट किंवा ओव्हरड्राफ्ट सारखी कर्ज देण्यास अनुमती आहे. अन्य कोणत्याही स्वरूपाची उदाहरणार्थ खरेदी अथवा चेक डिस्काउंट इत्यादी कर्ज देण्यास मान्यता नाही.

4) एक व्यक्ती विविध कर्ज- एकाच व्यक्तीला किंवा त्या व्यक्तीशी संबंधित उपविधीतील नातेवाईक व्याख्येनुसार नातेवाईकांना एकाच समान तारणावर वेगवेगळ्या व्यक्तींना संस्थेच्या एक किंवा अनेक शाखांमधून कर्ज दिली असल्यास व त्यापैकी कोणतेही एक कर्ज एनपीए झाले असल्यास त्या व्यक्तीच्या वरील प्रमाणे संबंधित सर्व शाखातील कर्ज व्यवहारास एनपीए समजून त्या सर्व प्रकारातील सर्वात खालच्या पातळीवरील वर्गीकरणाच्या आधारावर इतर सर्व खात्यांचे वर्गीकरण करून त्या वर्गीकरणातील टक्केवारीनुसार सर्वच खात्यांचे बाबतीत आवश्यक ती तरतूद करावी. म्हणजे कर्जदाराचे एक खाते एनपीए झाल्यास इतर सर्व कर्ज खाती उत्पादित असली तरीही ती खाती एनपीए खात्याअंतर्मत येतील.

5) सहभाग कर्ज -एकाच कर्जदाराला जेव्हा अनेक पतसंस्था, बँका अथवा वित्तीय संस्था एकत्र येऊन कर्ज देतात तेव्हा त्या कर्जाच्या परतफेडी बाबत प्रत्येक संस्थेचा अनुभव वेगळा असू शकतो. त्यामुळे प्रत्येक संस्थेने त्यांच्या कर्जाचे स्वतंत्रपणे कर्ज वसुलीचे वस्तुस्थितीच्या आधारावर अनुत्पादक व उत्पादक असै वर्गीकरण करावयाचे आहे.

6) कर्ज खाते एनपीए झाल्यावर उत्पन्नात घेतलेले थकीत व्याज उलटवून घेण्यात यावे. नियामक मंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार संस्थेने अनुत्पादित मालमत्ता वर्गीकरणतसेच मालमत्ता वर्गीकरण बदल है स्वयंचलित संगणकीय कार्यप्रणाली (सिस्टम बेस) मधूनच करणे आवश्यक आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप असता कामा नये.

7) संस्थांच्या संचालक मंडळांनी प्रत्येक मासिक सभेमध्ये संस्थैची कर्ज थकबाकी व एनपीए कमी होण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. सदर सभेमध्ये सदर उपाययोजना अंतर्गत किमान 20 मोठ्या थकबाकीदार कर्जाचे बाबतीत चर्चा होऊन प्रकरण निहाय वसुलीचा आढावा घेऊन उचित कारवाईबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

8) प्रत्येक वर्षी बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी दिनांक 31 मार्च अखेरचे एनपीए बाबत लेखापरीक्षण 31 जुलै पूर्वी पूर्ण झाल्यावर एक महिन्याचे आत मात्र उशिरात उशिरा दिनांक 31 ऑगस्ट पर्यंत संबंधित निबंधक यांच्याकडे सदरचा नमुन्यातील अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

- **कर्ज खात्याव्यतिरिकत अनुत्पादित मालमत्तेत समाविष्ट होणाऱया इतर बाबी**

1) बचत, चालू किंवा देयता बाजूस असणाऱ्या कोणत्याही शीर्षकांतर्गत खाते जुळवणी मध्ये फरक असून त्यामध्ये कोणतीही नावे बाकी असल्यास निर्धारित वर्गीकरण कालावधीचा विचार न करता त्या नावे बाकीची 100% तरतूद करावी.

2) रोख रकमेमध्ये पुस्तकी शीलकी पेक्षा जेवढी रक्कम कमी आढळल्यास, तसेच फाटक्या, तेलकट किंवा चलनबाहय नोटा असल्यास त्याची शंभर टक्के तरतूद करावी.

3) सर्व बँकांमधील चालू अथवा बचत ठेव खात्यांचे दरमहाचे ताळमेळ पत्रक तयार करताना त्यामध्ये बँकेला येणे असलेल्या निर्धारित कालावधी 180 दिवसापेक्षा जादा कालावधीच्या प्रलंबित नोंदीच्या रकमांची शंभर टक्के तरतूद करावी.

4) सर्व बॅकांमधील मुदत ठेव स्वरूपात असणाऱ्या गुंतवणुकीवरील व्याज अथवा मुद्दल देय दिनांकापासून निर्धारितः थकीत कालावधी पेक्षा अधिक कालावधी पेक्षा थकीत असल्यास या गुंतवणुकीवरील व्याज हे उत्पन्नास घेता येणार नसल्याने, वसूल न झालेले सर्व व्याज उत्पन्नातून काढून टाकावे लागेल, तसेच मुद्दल रकमेची प्रतिवर्ष समान हप्त्यामध्ये पुढील दहा वर्ष सलग तरतूद करावी,

**वैधानिक लेखापरीक्षकाने प्रमाणित केल्याप्रमाणे ढोबळ अनुत्पादित मालमत्ता (ग्रॉस एनपीए) आदर्श कमाल प्रमाण 10% व निव्वळ अनुत्पादित मालमत्ता (नेट एनपीए) यांचे आदर्श कमाल प्रमाण 5% राहील.**

**- तान्हाजी नथु कवडे**
**सहनिबंधक लेखापरीक्षण**
**महाराष्ट्र राज्य पुणे (सेवानिवृत्त)**

# पतसंस्थांसाठी महत्वाची मानके आणि रेशो

- तान्हाजी नथु कवडे, सहनिबंधक लेखापरीक्षण महाराष्ट्र राज्य पुणे (सेवानिवृत्त)

**स्वनिधी.**

अ 1) वसुल भागभांडवल
2) राखीव निधी
3) इमारत निध
4) लाभांश समानीकरण निधी
5) गुंतवणूक चढउतार निधी
6) उत्तम जिदंगी/उत्पादक कर्ज तरतूद
7) शिल्लक नफा(मागील शिल्लक.
नफा + चालू वर्षातील नफ्यातून अंदाजित लाभांश वजा जाता नफा.)
8) एनपीए जादा तरतूद
9) मुक्त व विकास निधी(कोणतीही बाह्य देयता नसणारा निधी(

**ब) वजा**

1) सूचित तोटा
2) कमी केलेली एनपीए तरतूद
3) कमी केलेली थकव्याज तरतुद
4) कराव्या लागणाऱ्या परंतु न केलेली खर्चाची तरतुद.

अ-ब= एकुण स्वनिधी.

**स्वनिधी काढणेचे फायदे /उपयोग.**

सीआरएआर काढणेसाठी, ठेवी किती स्वीकारल्या पाहिजेत, शेअरचे मूल्यांकन काढताना, वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा ठरविणे, सीडी रेशो काढताना, पतसंस्थांचे मार्कशीट भरताना

**2) सीआरएआर (Capital to Risk Weighted Asset Ratio)**

सुत्र पुढीलप्रमाणे—

$$\frac{\text{स्वनिधी (Net Worth)}}{\text{जोखीम भारीत मालमत्ता /जिदंगीचे मुल्य}} \times 100$$

स्वनिधी हा क्रमांक1 प्रमाणे काढणेत यावा. सद्यस्थितीत सदरचे प्रमाण हे 9% एवढे आहे.

**3)भागांचे मूल्यांकन (share valuation)**

संस्थेचे वर्ष अखेरीस असलेल्या नक्त मूल्याच्या रकमेनुसार व विक्री झालेल्या भागांच्या संख्येनुसार एका भागाचे मूल्य काढले जाते.

$$\text{प्रतिभागाचे मूल्य} = \frac{\text{संस्थेचे नक्त मूल्य (Net Worth)}}{\text{विक्री झालेल्या एकूण भागांची संख्या}}$$

नक्त मूल्य क्रमांक 1 नुसार घेण्यात यावे.

**भाग परत करण्याची पद्धत –**

1) सदरचे मूल्यांकन भागाच्या दर्शनी किमतीपेक्षा कमी असल्यास त्याप्रमाणे भागाची रक्कम अदा करावी.

2) कोणत्याही परिस्थितीत दर्शनी किमतीपेक्षा जादा दराने भागाची रक्कम अदा करता येणार नाही. याबाबतची तरतूद सहकार कायदा अधिनियम नियम 1961 नियम 23 मध्ये सांगितलेली आहे.

3) रोख राखीव निधी प्रमाण (CRR) (कलम 144-9) अ अन्वये.

संस्थेकडे असलेल्या मागील तिमाहीच्या एकूण ठेवीच्या 1 %पेक्षा कमी नसेल इतकी रक्कम लगतच्या चालू तिमाहिसाठी दैनंदिन पद्धतीवर रोख तरलता म्हणून ठेवणे आवश्यक आहे. रोख राखीव निधी प्रमाण नियमानुसार न ठेवल्यास ठेवल्यास कलम 144 31 अ अन्वये दंड आकारण्याची तरतुद आहे.

रोख राखीव निधीत खालील रकमांचा समावेश करण्यात यावा.

1) संस्थेकडे रोखीचे स्वरूपात असलेली रक्कम. नियम 107 मध्ये नमूद मर्यादा.
2) निरनिराळ्या बँकेतील बचत खात्यातील एकूण रक्कम.
3) निरनिराळ्या बँकेतील चालू खात्यातील रक्कम.
4) पंधरा दिवसापेक्षा जास्त नाही एवढ्या मुदतीच्या अल्पमुदत ठेवीची रक्कम.

नियामक मंडळ परिपत्रक दिनांक 10/05/2019 अन्वये रोखता निधी विवरणपत्रक प्रत्येक तिमाहीच्या अखेरच्या पंधराव्या दिवशी नियामक मंडळास सादर करणे आवश्यक आहे.

**4) वैधानिक तरलता निधी (Statutory Liqidity Ratio) (144)(10) अ अन्वये.**

संस्थेकडे असलेल्या मागील तिमाहीच्या एकूण ठेवीच्या 25 टक्के पेक्षा कमी नाही इतकी रक्कम लगतचे चालू तिमाहीसाठी मुदत ठेवीमध्ये दैनंदिन पद्धतीवर तरलता म्हणून ठेवण्यात येईल.

**एस एल आर ची गुंतवणूक पुढील प्रमाणे करण्यात यावी.**

- राज्य सहकारी बँक
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.
- नागरी सहकारी बँक (मागील सतत तीन वर्ष लेखापरीक्षण वर्ग अ पाहिजे व आरबीआयच्या अद्यावत तपासणी नुसार अ ग्रेड असणारी बँक.
- राष्ट्रीयकृत बँक तथा प्रादेशिक बँका (संस्थेच्या मुख्यालय ठिकाणी असलेल्या बँका व ए ग्रेड असलेल्या बँका.
- राज्य शासनाने परवानगी दिलेल्या कोणत्याही प्रकारांमधील गुंतवणूक.

तरलता निधीचे विवरणपत्र प्रत्येक तिमाहीच्या पंधराव्या दिवशी नियामक मंडळास सादर करणे बंधनकारक आहे. सदर तरलता प्रमाण न ठेवल्यास कलम 144 (31 अ )अन्वये दंडाची तरतूद आहे.

**5) ए एल आर आणि ए बी आर (ALR &ABR)**

एएलआर म्हणजे कर्जाचा सरासरी व्याजदर(Average Lending Rate)
एबीआर म्हणजे ठेवीचा सरासरी व्याजदर (Average Borrowing Rate)

सुत्र खालील प्रमाणे.

1) ALR = वर्षभरात कर्जावर मिळालेले व्याज (Interest Received during the year)
------------------------------------------ ×100
वर्षातील कर्जाची सरासरी(Average Loan)

2) ABR. = वर्षभरात ठेवीवर दिलेले व्याज
------------------------------------ ×100
वर्षभरातील ठेवीची सरासरी.

ALR - ABR = दुरावा किमान 3% असावा.
सदरचा दुरावा जेवढा जास्त तेवढा संस्थेचा नफा जास्त

**6) सीडी रेशो (क्रेडिट डिपॉझिट रेशो)**
कर्ज व ठेवी यांचे प्रमाण
तपशील खालील प्रमाणे
**अ) 1) वसूल भाग भांडवल 2) ताळेबंदातील सर्व निधी**
**ब) वजा**

1)राखीव निधी
2) संशयित व बुडीत निधी (जादा तरतूद असल्यास वजा करू नये)
3) स्थावर व जंगम मालमतेतील गुंतवणूक
4) घसारा निधी
5) कर्मचारी कल्याण निधी
6) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी
7) कर्मचारी उपदान निधी
8)सहकारी संस्थांच्या भागातील गुंतवणूक
9) संचित तोटे

**सीडी रेशो काढण्याचे सूत्र खालील प्रमाणे**

सीडी रेशो = कर्ज - कर्ज वाटपास उपलब्ध निधी
-------------------------------------×100
ठेवी

सी डी रेशो चे आदर्श प्रमाण 65 ते 70 टक्के असावे.

- 70 टक्के पेक्षा जास्त गुणोत्तर असल्यास तेथे अति उचल असते आणि तरलतेचे मर्यादेचा भंग होण्याची शक्यता असते.
- हे प्रमाण 65 टक्के पेक्षा कमी असल्यास संस्थेच्या निधीचा योग्य तो वापर होत नाही व तेथे संस्थेचे लाभ परदेयतेचे ( उत्पन्नाचे) नुकसान होऊ शकते.

**7) Gross NPA (ढोबळ अनुत्पादक कर्ज)**

सूत्र खालील प्रमाणे

ढोबळ एनपीए टक्केवारी
--------------------------------×100
एकूण कर्ज

ढोबळ अनुत्पादक कर्ज =एनपीए झालेल्या सर्व. कर्जाची येणे बाकी
----------------------------------------×100
एकूण ढोबळ कर्ज

सदर गुणोत्तर हे 10 % पर्यंत आदर्श मानले जाते.

**8) Net Npa (निव्वळ अनुत्पादक कर्ज)**

सूत्र खालील प्रमाणे

निव्वळ एनपीए टक्केवारी =निव्वळ एनपीए
------------------------×100
निव्वळ कर्ज

निव्वळ एनपीए कर्ज =एकूण उत्पादित कर्ज - अनु त्पादक जिंदगीची केलेली तरतूद
---------------------------------------× 100
ताळेबंदानुसार येणे असलेले कर्ज - येणे व्याज तरतूद -एनपीए तरतूद.

आदर्श निव्वळ एनपीए(NPA)प्रमाण हे 5 % पर्यंत आदर्श मानले जाते.

**9)प्रशासकीय व आस्थापना खर्च प्रमाण (कलम 144-8 अ)**

नियामक मंडळ सभा परिपत्रक दिनांक 10/5/2019 नुसार वरील प्रमाण हे संस्थेच्या खेळत्या भाडंवलाचे 2% पेक्षा अधिक असणार नाही. खेळते भांडवल म्हणजे ताळेबंदातील देयता बाजूची एकूण बेरीज वजा दुबेरजी व्यवहाराच्या रकमा. उदाहरणार्थ, एनपीए कर्जावरील व्याज, मुख्यालय व शाखा येणे देणे रकमा इत्यादी. आस्थापना व प्रशासकीय खर्च म्हणजे नफा तोटा पत्रकातील खर्च बाजूकडील व्याज व कायदेशीर तरतुदी यांच्या रकमा वजा जाता उर्वरित सर्व खर्चाची बेरीज.

व्यवस्थापन खर्च -

आस्थापना व प्रशासकीय खर्च =
--------------------×100
खेळते भांडवल

आस्थापना खर्च 2% इतका मर्यादित असावा.

**10)कासा डिपॉडिट (CASA=Current Account &Savings Account)**

चालू ठेवी ---------35% (एकुण ठेवीच्या)

बचत ठेवी---------15% (एकुण ठेवीच्या)

मुदत ठेवी---------50% (एकुण ठेवीच्या)

कासा ठेवीचे व्याजदर कमी असलेने देणे व्याजाच्या खर्चात बचत होउन लाभात वाढ होते.

क आर्थिक प्रमाणके:-

खालील आर्थिक प्रमाणकांबाबत तपशिलवार अभिप्राय नमूद करावेत.

| अ.क्र. | तपशिल | गणना सुत्र | आदर्श प्रमाण % | प्रत्यक्ष प्रमाण |
|---|---|---|---|---|
| अ | खेळत्या भांडवलाशी प्रमाण | | | |
| | १ वसुल भाग भांडवल | वसुल भाग भांडवल ÷ खेळते भांडवल X १०० | २ ते ४ | |
| | २ निधी | एकुण निधी ÷ खेळते भांडवल X१०० | ४ ते ६ | |
| | ३ ठेवी | एकुण ठेवी ÷ खेळते भांडवल X१०० | ८० ते ८५ | |
| | ४ इतर देणी | इतर देणी ÷ खेळते भांडवल X१०० | २ ते ३ | |
| | ५ निव्वळ नफ़ा | निव्वळ नफ़ा ÷ खेळते भांडवल X१०० | १ ते २ | |
| | ६ रोख व बँकेतील शिल्लक | रोख व बँकेतील शिल्लक ÷ खेळते भांडवल X१०० | ४ ते ६ | |
| | ७ गुंतवणुक | गुंतवणुक ÷ खेळते भांडवल X१०० | २५ | |
| | ८ कर्जे | एकुण कर्जे ÷ खेळते भांडवल X१०० | ६० ते ६५ | |
| | ९ इतर येणी | इतर येणी ÷ खेळते भांडवल X१०० | ६ | |
| | १० एकुण ऊत्पन्न | एकुण ऊत्पन्न ÷ खेळते भांडवल X१०० | ११ | |
| | ११ व्यवस्थापन खर्च | व्यवस्थापन खर्च ÷ खेळते भांडवल X १०० | २ | |
| ब | एकूण उत्पन्नाशी प्रमाण | | | |
| | १ निव्वळ नफयाचे | निव्वळ नफ़ा ÷ एकुण उत्पन्न X१०० | १० | |
| | २ व्यवस्थापन खर्चाचे | व्यवस्थापन खर्च ÷ एकुण उत्पन्न X१०० | ३० ते ३५ | |
| | ३ आस्थापना खर्च | आस्थापना खर्च ÷ एकुण उत्पन्न X१०० | २० ते २५ | |
| | ४ दिलेले व्याज | दिलेले व्याज ÷ एकुण उत्पन्न X१०० | ५० ते ५५ | |
| क | अन्य प्रमाणके | | | |
| १ | निधीच्या खर्चाचे प्रमाण | ठेवीवर दिलेले व्याज+ कर्जावर दिलेले व्याज ÷ठेवी+कर्जे X१०० | ९% | |
| २ | एकूण उत्पन्नाशी प्रमाण | नफ़ा÷उत्पन्नX१०० | १०% | |
| ३ | निव्वळ नफयाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण | निव्वळ नफा ÷सरासरी खेळते भांडवल X१०० | ९% | |
| ४ | व्यवसायातील नफयाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी | व्यवसायातील नफा | | |

41

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रमाण | (तरतूदीपुर्वी) ÷ सरासरी खेळते भांडवल ×१०० | 2% | |
| ५ | नफयाचे कर्ज +गुंतवणूकिशी प्रमाण | निव्वळ नफा / कर्ज + गुंतवणूक ×100 | 9.24% | |
| ६ | व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | व्यवस्थापन खर्च ÷ खेळते भांडवल × १०० | 2.40% | |
| ७ | मुदत ठेवीचे एकूण ठेवींशी प्रमाण | मुदत ठेवी (बचत व चालू ठेवी वगळून) ÷ एकूण ठेवी ×१०० | 60 ते 80% | |
| ८ | सरासरी ठेव वाढीचे प्रमाण | गतवर्षीतील ठेव ÷ सरासरी ठेव ×१०० | 4% | |
| ९ | स्वनिधिचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | स्वनिधि ÷ खेळते भांडवल ×१०० | 4% | |
| १० | सभासद वाढीचे प्रमाण | चालू वर्षातील सभासद संख्या वाढ / गतवर्षातील सभासदसंख्या ×१०० | 4% | |
| ११ | थकबाकिचे कर्जाशी प्रमाण | थकबाकी ÷ एकुण कर्ज ×१०० | 4% | |
| १२ | सी डी रेशो | एकूण कर्ज — उपलब्ध निधी ÷ ठेवी × १०० | ६५ ते ७० % | |
| १३ | ढोबळ अनुत्पादक जिंदगी प्रमाण | एनपीए झालेल्या सर्व कर्जाची येणे बाकी ÷ एकूण ढोबळकर्ज ×१०० | 40% | |
| १४ | निव्वळ अनुत्पादक जिंदगी प्रमाण | ढोबळ अनुत्पादिक जिंदगी — अनुत्पाक जिंदगीची केलेली तरतूद ÷ अनुत्पादक कर्ज ×१०० | 0 ते 4% | |